# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३८/२०२६**

विद्यापीठातील सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त ''आंतर विद्यापीठ शिक्षकेतर कायम महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६'' चे महाराष्ट्रातील सर्व कृषी/अकृषी/आरोग्य तसेच तांत्रिक **विद्यापीठातील शिक्षकेतर कायम महिला कर्मचारी** यांचेकरिता खालीलप्रमाणे अंदाजे दि १५ मे, २०२६ ते दिनांक ३१ मे, २०२६ या कालावधीत पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात येथे आयोजित करण्यात येणार आहे.

| अ) सांस्कृतिक स्पर्धा प्रकार | आ) क्रीडा स्पर्धा प्रकार |
|---|---|
| रांगोळी | बॅडमिंटन |
| वैयक्तिक नृत्य | खो-खो |
| वैयक्तिक गायन | रस्सीखेच |
| समूह नृत्य | रोड रेस |
| समूह गायन | |

सदर स्पर्धेमध्ये ज्या महिला कर्मचा-यांना सहभागी व्हावयाचे आहे, त्या कर्मचा-यांनी सोबत जोडलेला विनंती अर्ज आपल्या विभागप्रमुखांमार्फत उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष यांचेकडे दिनांक २०/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सादर करावा. प्राप्त झालेल्या अर्जातून संघाची निवड करण्यात येईल. निवड करण्यात आलेल्या संघास सदर स्पर्धेस जाण्याकरीता परवानगी देण्यात येईल.

सोबत :- पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे दिनांक ०७/०२/२०२६ रोजीचे पत्र.

**(सीएमए (डॉ.) चारुशीला गायके)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 993
दिनांक : 17 MAR 2026

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व शैक्षणिक विभागप्रमुख
२. सर्व प्रशासकीय शाखाप्रमुख

} सदर परिपत्रक संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती

नाव :-

पदनामः-

विभागः-

सेवक क्रमांकः-

दिनांकः-

प्रति,

मा.उपकुलसचिव,

प्रशासन शिक्षकेतर कक्ष,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

पुणे-४११००७.

विषय :- "आंतर विद्यापीठ शिक्षकेतर कायम महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६" मध्ये सहभागाबाबत.

महोदय,

मी विद्यापीठात ________________ या पदावर कार्यरत असुन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त "आंतर विद्यापीठ शिक्षकेतर कायम महिला कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६" करीता जाण्यास इच्छुक आहे. सदर स्पर्धेतील ________________ सांस्कृतिक स्पर्धा प्रकार तसेच __________________ सदर क्रीडा स्पर्धा प्रकारास विद्यापीठ संघ निवड प्रक्रीयेकरीता माझ्या अर्जाचा विचार करावा, ही विनंती

आपली विश्वासु,

(                    )

मा.विभागप्रमुख यांचेमार्फत सादर.